# प्रेसनोट दि. १४/०८/२०१८

## पंचतारांकित हॉटेल वर छापा कारवाईद्वारे १ परदेशी महिलेची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.१३/०८/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक नितिन तेलंगे यांचेकडुन माहीती मिळाली की, एंजट राजेश हा आपले साथीदार सुरज बुना याच्या मदतीने देशातील व परदेशातील मुली वेश्याव्यवसायासाठी मिळवुन वेगवेगळ्या पंचतारांकित हॉटेल मध्ये त्यांचे नावे रुम बुक करुन तेथे ठेवुन, वेश्यागमनासाठीच्या ग्राहकांबरोबर मोबाईल फोनच्या माध्यमातुन संपर्क साधुन, वेश्यागमनासाठीची रक्कम ठरवुन ग्राहकांना नमुद हॉटेल रुम्समध्ये पाठवुन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असले बाबत अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी व डेक्कन पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. हेमंत भट व कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करून पंचतारांकित हॉटेलमध्ये चालत असलेल्या हायप्रोफाईल वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान १ उजबेकीस्तान परदेशी पिडीत महिलेची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन आरोपी इसमनामे १) राजेश २) सुरज बुना या आरोपीतांचे विरुध्द डेक्कन पो.स्टे. १४६/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ९०००/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत परदेशी महिलेस रेस्क्यु फाऊन्डेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि अनंत व्यवहारे, नितिन तेलंगे, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, नितिन तरटे, राजेद्र कचरे, अनुराधा धुमाळ, गीताजंली जाधव, राजेद्र ननावरे, सुनिल नाईक, तुषार आल्हाट, सचिन शिंदे, रुपाली चांदगुडे, यांनी व डेक्कन पोलीस स्टेशनचे वपोनि श्री. हेमंत भट व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.